# भिवापूर महाविद्यालय, भिवापूर जि. नागपूर
## समाजशास्त्र पदव्यूत्तर विभाग

### लघुशोध प्रकल्प

### सत्र– 2022–2023

# "भिवापूर तालुक्यातील तास या गावातील अनुसुचित जातीच्या सामाजीक व आर्थिक स्थितीचे अध्ययन"


**संशोधनकर्ते**

**एम.ए. भाग.1 समाजशास्त्र विदयार्थी**

**मार्गदर्शक**

**प्रा. डॉ. विजय एस. दिघोरे**
**(समाजशास्त्र विभाग प्रमुख)**
**एम.ए., एम.फिल., पीएच.डी.**
**भिवापूर महाविदयालय, भिवापूर**

# अनुक्रमणिका


| अनु क्र. | विवरण | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | मार्गदर्शक प्रमाणपत्र | |
| २. | प्रतिज्ञापत्र | |
| ३. | प्रकरण पहीले<br>प्रस्तावना | |
| ४. | प्रकरण दुसरे<br>अध्ययन पध्दती | |
| ५. | प्रकरण तिसरे<br>तथ्यांचे विश्लेषण व सारणीयन | |
| ६. | प्रकरण चौथे<br>अ) ठळक निष्कर्ष<br>ब) गृहीतकृत्याची पडताळणी<br>क) सुचना व शिफारशी | |
| ७. | परिशिष्ठ<br>अ) संदर्भ ग्रंथुसची<br>ब) मुलाखत अनुसुची | |

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, एम.ए. भाग 1 चे विद्यार्थ्यांनी "भिवापुर तालुक्यातील तास या गावातील अनुसुचित जातीच्या सामाजीक व आर्थिक स्थितीचे अध्ययन" या विषयावरील लघुशोध प्रबंध माझ्या मार्ग दर्शनाखाली विद्यार्थ्यांनी पूर्ण केला आहे.

मार्गदर्शन व निरीक्षण करीत असतांना माझ्या असे निदर्शनास आले की, प्रस्तुत विषयावर अभ्यास करण्या करीता लागणाऱ्या आवश्यक गरजा व अपेक्षा संशोधन कर्त्यांनी कठोर परिश्रमाने व प्रामाणिकपणे पूर्ण केलेला आहे.

स्थळ : भिवापूर

दिनांक :

मार्गदर्शक.

प्रा. डॉ. विजय एस. दिघोरे
(समाजशास्त्र विभाग प्रमुख)
एम.ए., एम.फिल., पी.एच.डी.
भिवापूर माहाविद्यालय भिवापूर, भिवापूर

# प्रमाणपत्र

आम्ही प्रमाणित करतो की, "भिवापूर तालुक्यातील तास या गावातील अनुसुचित जातीच्या सामाजीक व आर्थिक स्थितीचे अध्ययन" या शिर्षकाखाली मानव्यविद्या शाखे अंतर्गत समाजशास्त्र विषयाच्या प्रकल्प अध्यापनासाठी ( एम.ए भाग–1) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांना सादर होत असलेला हा लघु शोधप्रकल्प खालील विद्यार्थ्यांनी प्रा. डॉ .विजय शंकरराव दिघोरे यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या प्रामाणीक कार्यातून साकार झालेला आहे. हा प्रकल्प विद्यार्थ्यांनी अभ्यासपूर्ण आणि योग्य असा केला आहे अशी आम्हाला खात्री आहे. या प्रकल्पाचा कोणताही अंश यापूर्वी कधीही, कुठेही व कोणत्याही अवधीसाठी सादर झालेला नाही.

मी प्रमाणित करतो की, उपरोक्त विषयावरील हा शोध प्रकल्प परीक्षेसाठी सादर करण्याच्या योग्यतेचा आहे.

ठिकाणः भिवापूर

दिनांकः 30 / 04 / 2023

## संशोधनकर्ते

1) श्री. पंकज रामभाऊ तिडके
2) श्री. प्रफुल रघुवीर कुहीकर
3) कु. शितल सुधिर अंबादे
4) कु. मोनाली उमाकांत ऊरकुडे
5) कु. सानिका अनंत येळणे
6) कु. लक्ष्मी सुखराम उईके
7) श्री. जितेन्द्र कमलाकर मांढरे
8) कु. प्रतिमा रामदास मेश्राम
9) कु. रागीणी गौतम श्रिरामे
10) कु. वैश्नवी विठ्ठल खवास
11) कु. माधवी प्रमोद बन्सोड
12) कु. आचल रामदास भोयर
13) कु. अमृता शशीकांत रेवतकर
14) श्री. प्रणय देवराव शेरकी

मार्गदर्शक
डॉ. विजय शंकरराव दिघोरे
समाजशास्त्र विभागप्रमुख

Bhiwapur Mahavidyalaya, Bhiwapur, Dist. Nagpur

प्राचार्य
डॉ. जोबी जॉर्ज
भिवापूर महाविद्यालय, भिवापूर

Principal
Bhiwapur Mahavidyalaya,
Bhiwapur

### प्रकरण पहिले

# : प्रस्तावना :

जगातील सर्व माणसं सारखी आहेत. प्रत्येक व्यक्ती आणि समाजाच्या मुलभूत गरजा समान आहेत. परंतु धर्म, वंश, लिंग, संपत्ती इत्यादी गोष्टींच्या आधारावर मानव समाजात भिन्नता आढळते. या आधारावर माणसांमध्ये श्रेष्ठ-कनिष्ठ अशा प्रकारचा भेद केला जातो. इतकेच नव्हे तर या आधारावर कनिष्ठ मानल्या गेलेल्या लोकांना मुलभूत अधिकारांपासून वंचित केले जाते. त्यांना प्रगती करू दिली जात नाही. त्यामुळे हे लोक इतर लोकांच्या तुलनेत मागासलेले असताता. **उदा.** अमेरिकेत वंशाच्या आधारावर भेद केला जायचा. गोरे लोक स्वत:ला श्रेष्ठ आणि निग्रो वंशाच्या लोकांना कनष्ठि मानत असत. गोऱ्या लोकांनी  निग्रो  लोकांचा खूप छळ केला. त्यांना मुलभूत अधिकारांपासून वंचित ठेवण्यात आले होते. त्यामुळे अमेरिकन समाजात निग्रो लोक समाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेले राहिलेत. आता मात्र अमेरिकेत वंशाच्या आधारावर श्रेष्ठ-कनिष्ठ असा फरक केला जात नाही. त्यामुळे निग्रो लोकांनी सुद्धा गोऱ्या लोकांप्रमाणेच विविध क्षेत्रात प्रगती केली आहे. निग्रो वंशाचे अमेरिकन **बराक ओबामा** यांची अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष म्हणून बहुसंख्यांक असलेल्या गोऱ्या लोकांनी दोनदा निवड केली होती. संपत्तीच्या आधारावर समाजाचे श्रीमंत गरीब अशा दोन प्रमुख वर्गात विभाजन केले जाते. श्रीमंत वर्गाच्या तुलनेत गरीब वर्ग जीवनाच्या सर्वच क्षेत्रात मागासलेला असतो. भारतात जातिव्यवस्थेमुळे काही जाती श्रेष्ठ तर काही जाती कनिष्ठ आहेत. देशातील अस्पृश्य मानल्या गेलेल्या लोकांना मुलभूत मानवी अधिकारापासून शेकडो वर्ष वंचित ठेवण्यात आले होते.

**अनुसूचित जातीचा अर्थ** (Meaning of Scheduled Castes) : आपल्या लोकांवर प्राचीन काळापासूनच सामाजिक, धर्मिक, सांस्कृतिक आर्थिक आणि राजकीय बंधने लादली गेली होती.  या बंधनांमुळे अस्पृश्यांची अवस्था गुलामंपेक्षाही अत्यंत वाईट होती.  आधुनिक काळात **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या** प्रयत्नामुळे ब्रिटिश शासनाने अस्पृश्यांचा विकास घडवून आणण्यासाठी गोलमेज परिषदेतील निर्णयानुसार काही सवलती मान्य केल्या.  या सवलती देण्याच्या दृष्टीने1935 च्या भारतीय कायद्यानुसार या अस्पृश्य  जातींची एक किंवा **'अनुसूची'** (Schedule) तयार करण्यात आली. या अनुसूचित ज्या जातींचा समावेश करण्यात आला त्यांना **'अनुसूचित जाती'** (Scheduled Castes) म्हणतात.  अस्पृश्यांना दलित (Depressed) किंवा

**'मागासवर्गीय'** असे देखील म्हणतात. अस्पृश्य किंवा दलित म्हणजेच अनुसूचित जाती होय. भारतीय संविधानात अस्पृश्य जातींचा **'अनुसूचित जाती'** असा उल्लेख करण्यात आला आहे.

भारतात अनुसूचित जातींच्या लोकांची संख्या फार मोठी आहे. 1971 च्या जनगणना अहवालानुसार त्यांची संख्या 7 कोटी 99 लाख 95 हजार 896 होती. 1991 मध्ये अनुसुचित जातींची लोकसंख्या 13.828 कोटी होती म्हणजे एकुण लोकसंख्येच्या 16.73% लोकसंख्या अनुसुचित जातीच्या लोकांची होती. तर 2011 च्या जनगणनेनुसार अनुसूचित जातीची लोकसंख्या 20 कोटी 13 लाख 78 हजार इतकी आहे. भारताच्या एकूण लोकसंख्येमध्ये अनुसूचित जातीचे प्रमाण 16.6% आहे. अनुसूचित जातीच्या लोकांची संख्या सर्वात जास्त पंजाब, पश्चिम बंगाल आणि उत्तर प्रदेशात आहे.

भारतातील सर्वच राज्यात अनुसूचित जातीचे लोक आहेत. विभिन्न राज्यात वेगवेगळ्या नावाने या जाती ओळखल्या जातात. अनुसूचित जातींमध्ये महार,चांभार, (चमार), भंगी, पासी, खाटिक, डोम, दुसाध, बलाई, मोची, मेघवाल इत्यादी जाती प्रमुख आहेत. विषेष म्हणजे अनुसुचित जातींचे 84% लोक हे ग्रामीण भागात राहतात.

### ❖ संशोधन क्षेत्र - तास मार्ग :-

संशोधकाने निवडलेले संशोधन क्षेत्र हे नागपूर जिल्ह्यात असुन ता. भिवापूर वरून पश्चिमेस 4 कि.मी. अंतरावर आहे.

### ❖ तास गावाची ऐतिहासकि पार्श्वभुमी :-

तास गाव भिवापूर बस स्टॉप वरून पश्चिमेस 4 कि.मी. अंतरावर आहे. हे गाव उत्तरेस 1/2 कि.मी. आहे व नागपूर गडचिरोली महामार्गावरून 1/2 किमी उत्तरेस आहे. जवळच उच्च प्राथमिक शाळा असून इथे 1ली ते 8 वी पर्यंत वर्ग आहेत. गावाची लोकसंख्या 3005 असून गावात गट ग्रामपंचायत आहेत. या गट ग्रामपंचायत मध्ये तास, नवीन जवराबोळी व मोखाडा या तीन गावांचा समावेश आहे. या गावाची एकूण लोकसंख्या 3005 असून पुरूष 1746 असून आणि स्त्रियांची संख्या 1259 आहे. त्याचबरोबर अनुसूचित जातींची एकूण संख्या 945 आहे. त्यात पुरूषांची लोकसंख्या 535आहे तर स्त्रियांची लोकसंख्या 415 आहे. तास या गावात 1746 लोक साक्षर आहेत. व 131 निरक्षर आहेत. गावात सिमेंट रस्ते आहेत, गावात तीन विहिरी आहेत, गावात पिण्याच्या पाण्याकरिता नळाची सोय आहे, गावात विजेची सोय उपलब्ध आहे, गावात

शेतकरी वर्ग व मजूर वर्ग आहे, गावात अनु. जाती, तेली, ढिवार, माना, न्हावी जातीचे लोक राहतात. अनु. जातीच्या लोकांची कुटुंबे 72असून, 50 घरे ढिवर समाजाचे आहे. 46 घरे माना समाजाची आहेत, तर 67 घरे न्हावी समाजाची आहेत. त्यानंतर उरलेली घरे तेली समाजाची आहेत. शासकीय धोरणानुसार अनु. जातीचा प्रवर्गतील समावेश 30 आहे. भारतात असंख्य जाती आहे, तास गावात सुरूवातील 40 घरे अनु. जातीची होती. तास या गावातील लोकांची आर्थिक स्थिती, काही लोकांची चांगली तर काहींची कनिष्ठ दर्जाची निरीक्षणावरून दिसून येते, काही निवडक लोकांकडे शेती असल्याचे आढळते, तर बाकी संपूर्ण मजूर वर्ग आहे. इतर समाजाकडे शेती जास्त आहे. म्हणून नेहमी कामाला त्यांच्याकडे जावे लागते. समाज जीवनात अंधश्रध्दा आहे.अनु. जाती समाजाला शासकीय योजनांच्या लाभ कमी मिळालेला आहे. त्यामुळे विकासाची गती कमी आहे, शिक्षणाचे प्रमाण या समाजात कमी आहे. तरी या समाजामध्ये शासकीय व निम शासकीय योजना राबविल्या जात आहेत.

**तास या गावामध्ये अनुसूचित जातींसाठी शासनामार्फत व निम शासकीय योजना व लाभार्थी**

नवबौद्ध वस्तीचा विकासासाठी दोन रस्त्यांची कामे मंजूर झाली आहे, वाचनकक्ष बांधकाम तास, जवराबोळी प्रत्येकी एक असे दोन कामे करण्यात येत आहेत. वैयक्तीक लाभासाठी शिलाई मशिन लाभार्थी कु. मयुरी धनपाल चहांदे या मुलीला देण्यात आली आहे. त्याचबरोबर मुलींसाठी सायकल योजनेअंतर्गत लाभार्थी श्री. महेश रामचंद्र अलुने वर्ग 10 वी व आकाश ज्ञानेश्वर पाटील वर्ग 12 वी या विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आली आहे. सुशिक्षीत बेरोजगारांसाठी प्रशिक्षण, विशेष घटक योजने अंतर्गत अनु. जातींच्या लाभार्थ्यांसाठी 2 सिंचन विहिरीचे बांधकाम करण्यात आले आहे. रमाबाई आवास योजने अंतर्गत अनु. जातीच्या कुटुंबाची लाभार्थी संख्या 5 आहे. व या योजनेचे लाभार्थी 1) श्री. दिनेश टेंभरे 2) श्री. गजानन शंभरकर 3) श्री. क्रिष्णा गायकवाड 4) श्री. रोशन प्रभाकर श्रीरामे 5) श्री. प्रितम भिमराव शंभरकर हे आहेत. त्याचबरोबर प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत 5 घरांचे बांधकाम करण्यात आले आहे. त्यामधून श्री. विनोद संपत श्रीरामे व आसाराम हरी शंभरकर या लोकांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. व बाकी लोकांचे काम सुरू करण्यात येणार आहे. त्याचबरोबर विविध कामांचा विकास सरपंच श्री. युवराज तुलाराम शंभरकर व उपसरपंच सौ. वर्षा नरेंद्र ढोणे आणि सचिव श्री. ए. डी. गजघाटे यांच्या मार्गदर्शनात पार पाडले जात आहे.

## प्रकरण दुसरे

# अध्ययन पध्दती

❖ **संशोधनाचा अर्थ :-**

संशोधन म्हणजे नवीन ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी केलेले पध्दतशिर प्रयत्न होत."

संशोधनाला इंग्रजीत ' Reasearch' म्हणतात. या इंग्रजी शब्दाची फोड केली असता Re आणि Search हे दोन शब्द आहेत. Re म्हणजे पुन्हा आणि Search म्हणजे शोध घेणे.

वेबस्टरच्या कोषातही संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञान शाखेतील नवीन तथ्ये परिक्षणासाठी केलेला चिकित्सक व बध्दतशिर अभ्यास होय. अर्थात जुन्या ज्ञानाचे परिक्षण वनवीन ज्ञानसंपादन करणे हे दोन्ही घटक त्यात ओहे. हे ज्ञान संपादन करण्यासाठी जे पध्दतशिर प्रयत्न केले जातात त्याचाही समावेश यात होतो. संशोधन किंवा अनुसंधान ही एक बौध्दिक प्रक्रिया आहे. यातुन जन्या ज्ञानातुन उणिवा दूर करून नवीन ज्ञानात भर टाकली जाते.

❖ **संशोधनाची व्याख्या :-**

**जे. डब्ल्यू . बेस्ट :-**

"संशोधन म्हणजे वैज्ञानिक पद्धती प्रत्यक्ष कार्यान्वित करण्याची सुव्यवस्थित व नियमबद्ध अभ्यासक्रम प्रक्रिया होय."

❖ **संशोधन विषयाची निवड व सुसुत्रीकरण:-**

**व्याख्या :**

डॉ बोधनकर यांच्या मते:-

"एखादी विशिष्ट बाब एखाद्या विशिष्ट पध्दतीन घडावी किंवा घडू नये यासाठी संशोधकाने गहण् अध्ययनासाठी निवडलेली विशिष्ट समस्या म्हणजेच संशोधनासाठी केलेले समस्यासुत्रण होय."

संशोधन कार्य हे जरी सरळ व सोपे वाटत असले तरी ते तितके सोपे नाही. अध्ययनाचा विषय निवड केल्यानंतरही संशोधकाला आपल्या संशोधनाच्या विषयाचे उद्देश निश्चित करावे लागतात, त्याची मांडणी करावी लागते, उद्देश विधानाच्या स्वरूात मांडणे म्हणजेच संशोधन समस्यासुत्रण करणे किंवा समस्या निश्चित करणे होय. समस्या निवडलयानंतर ती शेवटपर्यंत पोहोचविण्यापर्यंत अनेक बाबींचा विचार करावा लागतो. ती एक सैध्दांतिक बाब असल्याने त्यांचा उल्लेख संशोधनामध्ये प्रकर्षाने केला जातो. समस्या सुत्रण करीत असतांना अध्ययनकर्त्यांनी विषयाची निवड आपण संशोधन कोणत्या क्षेत्रात करावयाचे तसेच लागणारा वेळ, श्रम, पैसा याचा विचार करूनसमस्या सोडविण्यात आली आहेत.

❖ **साहित्य परिक्षण:-**

लेखक :- प्रा. डॉ. सी. एच. निकुंभे यांनी याय पुस्तकात अस्पृश्य समाजाची स्वातंत्रपूर्व काळातील स्थिती, स्वातंत्रोत्तर काळ, बाबासाहेबांनी कशाप्रकारे अस्पृश्यांना अधिकार मिळवून दिले.

❖ **संशोधन विषयाचे महत्व:-**

एखाद्या विषयाचे संशोधन झाल्यावर त्याचे पडसाद समाजात संशोधकाच्या कार्यातून दिसत असतात.

1. या संशोधनातून समाजाला आपल्या त्रुटी व उणिवा संबंधी माहिती होईल.
2. हे संशोधन सरकारच्या इतर समाजसेवकांना उपयोगी होईल.
3. हे संशोधन सरकारच्याउपयोगात येईल. त्यांना या महार जातीची सद्यस्थिती लक्षात येईल.
4. या संशोधनामुळे सेमाजसेवा कार्यात काम करणाऱ्या समाजसेवी संस्था यांनाही उपयोगी होईल. त्यांना या क्षेत्राकरिता विशेष प्रयत्न करता येईल व विशेष माहिती मिळेल.
5. हे संशोधन आजच्या नवीन पिढीला उपयोगाचे ठरू शकेल कारण त्यांच्या खांद्यावर या देशाचे भवितव्य आहे. त्यामुळे जागरूक व कार्यरत नवयुवकच बदल घडवू शकतात.

या संशोधनामुळे त्या जातीच्या धर्म, संस्कृती, परंपरा, चालीरिती यांचा अभ्यास केला जातो. त्यामुळे त्या जातीविषयी सखोल माहिती मिळते व पूर्वीपेक्षा किती प्रगती, विकास झाला हे कळते. तसेच शासनाकडून मिळणाऱ्या विविध योजना या विषयी माहिती मिळते.

❖ **संशोधनाचे उद्देश (Objective of Study) :-**

1) अनुसुचित जातीमधल लोकांची वैयक्तिक व कौटुंबिक माहिती जाणून घेणे.
2) अनुसुचित जातीच्या लोकांच्या आर्थिक परिस्थितीचे अध्ययन करणे.
3) अनुसुचित जातीच्या लोकांच्या सामाजिक परिस्थितीचे अध्ययन करणे.
4) अनुसुचित जातीच्या कुटुंबाना शासनाकडुन मिळणाऱ्या योजनांचा लाभ कितपत मिळाला याचे अध्ययन करणे.

❖ **गृहितकृत्य (Hypothesis):-**

१) अनुसुचित जातीमधील लोकांचे उत्पन्न कमी असल्यामुळे त्यांचे राहणीमान कनिष्ठ दर्जाचे आहे.
२) अनुसुचित जातीच्या लोकांत शिक्षणाचे प्रमाण कमी आहे.
३) अनुसुचित जातीमधील लोकांत बऱ्याचशा अंधश्रध्दा आहेत.
४) सामाजिक, दैनंदिन व्यवहारातही इतरांकडुन भेदभाव केला जातो.

❖ **अध्ययनाचे क्षेत्र व विश्व :-**

संशोधन करतांना संशोधनकर्त्यांना अध्ययनाचे क्षेत्र व विश्व निवडायचे असते. कारण वेळ, पैसा व श्रम यांचा अपव्यय होऊ नये, यासाठी संशोधनकर्त्यांनी संशोधन अध्ययनाचे क्षेत्र म्हणून भिवापूर तालुक्यातील ग्रामपंचायत तास यागावाची निवड केली . तर ग्रामपंचायत तास या गावातील अनुसुचित जातीच्या लोकांचे सामाजिक व आर्थिक क्षेत्र हे विश्व आहे.

❖ **संशोधन आराखडा (Research Design ) :-**

वास्तविक परिस्थितीत उद्भवणाऱ्या व निर्माण होणाऱ्या प्रक्रियेला जे वास्तविक संशोधन कार्यान्वित करायचे असते, त्याला संशोधनाचा आराखडा असे म्हणतात.

**संशोधन आराखड्याचे चार प्रकार आहेत.**

१) अन्वेषणात्मक संशोधन आराखडा
२) वर्णनात्मक संशोधन आराखडा
३) निदानात्मक संशोधन आराखडा
४) प्रयोगात्मक संशोधन आराखडा

**१) वर्णनात्मक संशोधन आराखडा :-**

या आराखड्याचा मुख्य उद्देश एखाद्या समस्येशी संबंधीत असलेल्या वास्तविक तथ्यांच्या आधारे वर्णनात्मक विवेचन करणे हा आहे. त्यासाठी संशोधन विषयाच्याबाबतीत यथार्थ (सत्य आहे तेच ) आणि पूर्ण माहिती प्राप्त करून घेणे आवश्यक असते. म्हणजेच संशोधनासाठी यथार्थ माहिती नसेल तर ते संशोधन शास्त्रीय संशोधन आहे असे म्हटले जाणार नाही. याचाच अर्थ असा की, वास्तविक आणि विश्वसनिय तथ्ये हाच वैज्ञानिक वर्णनात्मक आधार आहे.

**२) निदानात्मक संशोधन आराखडा :-**

ज्ञान प्राप्ती किंवा ज्ञान विकास हा संशोधन अध्ययनाचा मुख्य उद्देश असतो. तसेच एखाद्या समस्येची वास्तविक ज्ञान करून घेणे म्हणजेच त्या समस्येची कारण परंपरा समजुन घेणे हा उद्देश असतो. तसेच ही कारण पंरपरा लक्षात घेऊन ती समस्या सोडविण्याचा दृष्टिने उपाय योजना सुचविली जाते. समस्या बाबत शास्त्रीय आधारावर अंदाज व्यक्त केले जातात.

संशोधनकर्ते हा शोध प्रबंध तयार करतांना अंशत: वर्णनात्मक संशोधन आराखडा व अंशत: निदानात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग करण्यात आला आहे.

❖ **नमुना निवड पध्दती ( Sampling Method) :-**

प्रतिनिधी सदस्य मिळून त्यांच्याकडून माहिती मिळविणे व ती माहिती संपूर्ण समुहाची किंवा समग्राची आहे हे मान्य असते. या पध्तीला नमुना निवड असे म्हणतात.

श्रीमती यंग यांच्या मते :- " एक सांख्यिकीय नमुना म्हणजेच संपूर्ण समुहाचा किंवा समग्राचा एक निवडलेला भाग होय."

**१) संभाव्यता नमुना निवड पध्दती :-**

संभाव्यता नमुना निवड पध्दतीमध्ये समग्रातील प्रत्येक एककाच्या नमुन्यात समावेश होण्याची संभाव्यता किती असते. हे समजणे समग्रातुन किंवा विश्वातून प्रत्येक एककाला नमुन्यात समाविष्ट होण्याची संधी किती प्रमाणात मिळणार आहे. हे सांख्यिकीय पध्तीने मांडण्याच्या पध्दतीला संभाव्य नमुना निवड पद्धती म्हणतात.

**२) गैरसंभाव्यता नमुना निवड पद्धती :-**

संभाव्यता नमुना निवड पध्दतीचा अगदी विरूद्ध या पद्धतीचे स्वरूप आहे. म्हणजेच जेव्हा संशोधन क्षेत्रातील एककाच संख्या किती आहे हे माहिती नसते. आणि त्या प्रत्येक एककाला नमुन्यामध्ये निवडले जाण्याची शक्यता किंवा टक्केवारीच्या परिभाषेत मांडता येत नाही, तेव्हा त्यला गैरसंभाव्यता नमुना निवड पद्धती म्हणतात.

कोणत्याही समस्या विषयाच्या समुहाशी संबंधित असणारी तथ्ये संकलित करण्याच्या पुढील दोन पद्धती आहेत.

१) प्रस्तुत संशोधन संभाव्यता नमुना निवडीतील लॉटरी या तंत्राचा वापर कयन 40 एककाची निवड केली आहे. ज्यावेळी समुहातील सर्व सदस्यांशी संपर्क प्रस्थापित करून संशोधक तथ्ये संकलित करतो, त्यावेळी त्या पद्धतीला 'गणना पद्धती' असे म्हणतात. यालाच समग्र सर्वक्षण असे म्हणतात.'तंत्रज्ञ' या वर्गात येणारी प्रत्येक व्यक्ती म्हणजे त्या समग्राचा "एकक' होय.

यावेळी संशोधन विश्वातील एककांची संख्या मर्यादित असते तयावेळी गणना पद्धतीचा उपयोग केला आहे.

२) नमुना पद्धती :-

ज्यावेळी संशोधन विश्वातील किंवा समग्रातील एककांची संख्या जास्त असते. त्यावेळी त्या समग्रातील एककांचा एक छोटासा "नमुना गट" निवडला जातो, आणि त्या नमुना गटातील समस्येशी संबंधित निष्कर्ष काढल्या जातात. यालाच नमुना पद्धती असे म्हणतात.

तास या गावतील अनुसुचित जाती मधील अनुसुचित जातीच्या लोकांची घरे 72 आहेत. प्रत्येकासोबत संपर्क साधने संशोधकाला शक्य आहे करिता अनुसुचित जातीमधील महार जातीच्या समुहाचा अभ्यास करण्यासाठी जनगणना पद्धती तथ्ये संकलनासाठी उपयोगात आणला आहे.

❖ **तथ्य संकलन पध्दती व तंत्रे ( Data Collection Method)** .

तथ्य संकलनाचा साधा वसोपा अर्थ म्हणजे माहिती गोळा करणे होय. संशोधक जेव्ह आपल्या संशोधनासाठी आवश्यक ती माहिती गोळा करतो, त्याला तथ्य संकलन असे म्हणतात.

तथ्य संकलनाच्या दोन पध्दती आहेत.

१) प्राथमिक पध्दती किंवा स्त्रोत

२) दुय्यम पध्दती किंवा स्त्रोत.

**दुय्यम पध्दती :-**

प्रकाशितांनी अप्रकाशीत अशा सर्व लेखी सामग्रीचा द्वितीय किंवा दुय्यम तथ्यांमधे अंतर्भाव होते. संशोधनाला आपल्या विषयाशी संबंधीत असणारी अनेक महत्वपूर्ण माहिती आकडेवारी इत्यादी बाबी या माध्यामाद्वारे प्राप्त होतात.

उदा. शासनाच्या जनगणना अहवाल हा दुय्यम सत्रोत आहेत. त्यावरून एकूण लोकसंख्या , धर्म, जाती, साक्षरता इत्यादी विविध बाबी संबंधी माहिती प्राप्त होते. अशी माहिती प्राप्त करणे कोणत्याही संशोधकाला द्वितीय स्त्रोताद्वारे मिळवावी लागते. ही माहिती प्राप्त करण्यासाठी पुढील माध्यमांचा उपयोग केला जातात.

१) प्राथमिक प्रलेख (कागदपत्रे )

२) सार्वजनिक प्रलेख (कागदपत्रे)

३) आत्मचरित्र , (जीवनचरित्रे)

४) पत्र

प्राथमिक पध्दतीमध्ये चर्चेच्या माध्यामतून मुलाखत या तंत्राद्वारे तथ्य संकलन करण्यात आले. अध्ययनाचे उद्देश व गृहितकृत्ये डोळ्यासमोर ठेवून मुलाखत तंत्राचा उपयोग करण्यात आला आहे. शिवाय काही आवश्यक माहिती निरीक्षण तंत्राद्वारे गोळा करण्यात आली.

दुय्यम पध्दतीद्वारे विषयांशी संबंधित पुस्तके, मासिके, संशोधन प्रबंध, वर्तमानपत्रे, साप्ताहिके, आरोग्य पत्रिका, तंज्ञाचे मत याद्वारे द्वितीयक माहिती प्राप्त करण्यात आली.

❖ **सारांश व निष्कर्ष:-**

माहिती संपादनाच्या आधारे उपलब्ध सरणीच्या आधारे निष्कर्ष काढण्यात आले. त्याकरिता सांख्यिकीय पद्धतीचा अवलंब करण्यात आला.

❖ **गृहितकृत्याची पडताडणी:-**

सदर संशोधन विषयाच्या अध्ययनासाठी संशोधन कार्यात मार्गदर्शन तसेच दिशा मिळण्यासाठी सुरूवातीला गृहितकृत्याची मांडणी करण्यात आली व त्यांची पडताडणी ही संशोधनाच्या शेवटी करण्यात आली आहे.

❖ **सुचना व शिफारशी :-**

माहितीच्या व विज्ञाप्तीकरणाच्या आधारे आणि उपलब्ध सारणीच्या आधारे निष्कर्ष काढून शेवटी निष्कर्षाच्या आणि विषयाच्या अनुषंगाने सुचना व शिफारशी देण्यात आल्या.

❖ **संदर्भ ग्रंथसुची :-**

लघुशोध प्रकल्पच्या शेवटी संदर्भ ग्रंथसुचीने होत असतो. संशोधकाने आपल्या

प्रकल्पविषयी कोणकोणत्या सामुग्रीचा वापर केला याविषयी माहिती संदर्भ ग्रंथसुची मध्ये देण्यात आली आहे.

# प्रकरण तिसरे
# तथ्यांचे विश्लेषण व सारणीयन

सारणी क्र. 3.1

**उत्तरदात्याचे लिंग दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | लिंग | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१. | स्त्री | ०५ | १२.५०% |
| ०२. | पुरूष | ३५ | ८७.५०% |
| | एकूण | ४० | १००.००% |

वरिल सारणीवरूण असे निदर्शनास येते की, अध्ययनाकरिता घेतलेल्याएकुण ४० उत्तरदात्यांपैकी ०५ म्हणजेच १२.५०% उत्तरदाते हे स्त्री आहेत. तर ३५ म्हणजेच ८७.५०% उत्तरदाते पुरूष आहेत.

वरील विश्लेषणावरून असे दिसुन येते की, जास्तीत जास्त उत्तरदाते पुरूष आहेत.

## सारणी क्र. ३.२

## उत्तरदात्याचे वय दर्शविणारी सारणी

| अ.क्र. | वयोगट | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१. | १८ ते २८ वर्ष | ०२ | ०५.००% |
| ०२ | २९ ते ३८ वर्ष | १२ | ३०.००% |
| ०३ | ३९ ते ४८ वर्ष | १४ | ३५.००% |
| ०४. | ४९ ते ५८ वर्ष | ०९ | २२.५०% |
| ०५. | ५९ वर्षाच्या वर | ०३ | ०७.५०% |
| | एकूण | ४० | १००.००% |

वरील सारणी वरून असे निदर्शनास येते की, अध्ययनाकरिता घेतलेल्या एकुण ४० उत्तरदात्यांपैकी ०२ म्हणजेच ०५.००% उत्तरदाते हे १८ ते २८ वर्ष वयोगटातील आहेत. तर १२ म्हणजेच ३०.००% उत्तरदाते २९ ते ३८ वर्ष वयोगटातील आहेत. तर ०९ म्हणजेच २२.५०% उत्तरदाते ४९ ते ५८ वर्ष वयोगटातील आहेत. तर ०३ म्हणजेच ७.५० उत्तरदाते ५९ वर्षाच्या वरचे आहेत.

वरील विश्लेषणावरून असे दिसुन येते की, जास्तीत जास्त उत्तरदाते ३९ ते४८ वर्ष वयोगटातील आहेत.

**सारणी क्रमांक ३.३**

**उत्तरदात्याचे शैक्षणिक पात्रता दर्शविणारी सारणी**

| अनु क्रमांक | शैक्षणिक पात्रता | वारंवतरिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१. | अशिक्षित | ०६ | २०.००% |
| ०२. | प्राथमिक | १४ | ३५.००% |
| ०३. | माध्यमिक | १० | २५.००% |
| ०४. | उच्च माध्यमिक | ०५ | १२.५०% |
| ०५. | पदवीधर | ०३ | ०७.५०% |
| ०६. | पदव्युत्तर | ०२ | ०५.००% |
| | एकूण | ४० | १००.००% |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, अध्ययनाकरिता घेतलेल्या एकुण ४० उत्तरदात्यांपैकी ०६ म्हणजेच २०.००% उत्तरदाते हे अशिक्षित आहेत. तर १४ महणजेच ३५.००% उत्तरदात्यांचे शिक्षण माध्यमिक पर्यंत झाले आहेत. तर १० म्हणजेच २५.००% उत्तरदात्यांचे शिक्षण माध्यमिक पर्यंत झाले आहेत. तर ०५ म्हणजेच १२.५०% उत्तरदात्यांचे शिक्षण उच्च माध्यमिक पर्यंत झाल आहेत. तर ०३ म्हणजेच ०७.५०% उत्तरदात्यांचे शिक्षण पदवी पर्यंत झाले आहेत. तर ०२ म्हणजेच ०५.००% उत्तरदात्यांचे शिक्षण पदव्युत्तर पर्यंत झाले आहेत.

वरील विश्लेषणावरून असे दिसुन येते की, जास्तीत जास्त उत्तरदात्यांचे शिक्षण प्राथमिक पर्यंत झाले आहेत.

## सारणी क्रमांक ३.४

## उत्तरदात्याचे वैवाहिक दर्जा दर्शविणारी सारणी

| अ.क्र. | वैवाहिक दर्जा | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१. | अविवाहीत | ०१ | ०२.५०% |
| ०२. | विवाहीत | ३५ | ८७.५०% |
| ०३. | विधवा | ०३ | ०७.५०% |
| ०४. | विधुर | ०१ | ०२.५०% |
| | एकूण | ४० | १००.००% |

वरिल सारणीवरूण असे निदर्शनास येते की, अध्ययनाकरिता घेतलेलया एकुण ४० उत्तरदात्यांपैकी ०० म्हणजेच ०२.५०% उत्तरदाते हे अविवाहित आहेत. तर ३५ म्हणजेच ८७.५०% उत्तरदाते हे विवाहित आहेत. तर ०३ म्हणजेच ०७.५०% उत्तरदाते ह्या विधवा आहेत. तर ०१ म्हणजेच ०२.५०% उत्तरदाते हे विधुर आहेत.

वरील विश्लेषणावरून असे दिसुन येते की, जास्तीत जास्त उत्तरदाते हे विवाहित आहेत.

### सारणी क्रमांक ३.५

### उत्तरदात्याच्या कुटुंबाचा प्रकार दर्शविणारी सारणी

| अनुक्रमांक | कुटुंबाचा प्रकार | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१. | संयुक्त कुटुंब | १७ | ४२.५०% |
| ०२. | विभक्त कुटुंब | २३ | ५७.५०% |
| | एकुण | ४० | १००.००% |

वरील सारणी वरून असे निदर्शनास येते की, अध्ययनाकरिता घेतलेल्या एकुण ४० उत्तरदात्यांपैकी १७ म्हणजेच ४२.५०% उत्तरदाते संयुक्त कुटुंबात राहतात. तर २३ म्हणजेच ५७.५० उत्तरदाते विभक्त कुटुंबात राहतात.

वरील विश्लेषणावरून असे दिसुन येते की, जास्तीत जास्त उत्तरदाते विभक्त कुटुंबात राहतात.

## सारणी क्रमांक ३.६

## घराचा प्रकार दर्शविणारी सारणी

| अनुक्रमांक | घराचा प्रकार | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१. | झोपडी | ०५ | १२.५०% |
| ०२. | मातीचे | १६ | ४०.००% |
| ०३. | सिमेंट | १९ | ४७.५०% |
| | एकुण | ४० | १००.००% |

वरिल सारणीवरूण असे निदर्शनास येते की, अध्ययनाकरिता घेतलेल्या एकुण ६० उत्तरदात्यांपैकी ०५ म्हणजेच १२.५०% उत्तरदात्यांचे घर झोपडीचे आहेत. तर १६ म्हणजेच ४०.०० % उत्तरदात्यांचे घर मातीचे आहेत. तर १९ म्हणजेच ४७.५०% उत्तरदात्यांचे घर सिमेंटचे आहेत.

वरील सारणीवरूण असे निदर्शनास येते की, जास्तीत जास्त उत्तरदात्यांचे घर सिमेंटचे आहेत.

## राजकीय व शैक्षणिक माहिती

सारणी क्रमांक ३.७

राकारणाशी असलेला संबंध दर्शविणारी सारणी

| अनु क्रमांक | पर्याय | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१. | तात्पुरता | १३ | ३२.५०% |
| ०२. | संबंध आहे | २० | ५०.००% |
| ०३. | संबंध नाही | ०७ | १७.५०% |
| | एकुण | ४० | १००.००% |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, अध्ययनाकरिता घेतलेल्या एकुण ४० उत्तरदात्यांपैकी १३ म्हणजेच ३२.५०% उत्तरदात्यांचे राजकारणाशी तात्पुरते संबंध आहेत. तर २० म्हणजेच ५०.००% उत्तरदात्यांचे राजकारणाशी संबंध आहेत. तर ०७ म्हणजेच १७.५०% उत्तरदात्यांचे राजकारणाशी संबंध नाही.

वरील विश्लेषणावरून असे दिसून येते की, जास्तीत जास्त उत्तरदात्यांचे राजकारणाशी संबंध आहेत.

## सारणी क्रमांक ३.८

## निवडणूक सहभाग दर्शविणारी सारणी

| अनु क्रमांक | पर्याय | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१. | सहभागी होता | २५ | ६२.५०% |
| ०२. | सहभागी होत नाही | १५ | ३७.५०% |
| | एकूण | ४० | १००.००% |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, अध्यनाकरिता घेतलेल्या एकूण ४० उत्तरदात्यांपैकी २५ म्हणजेच ६२.५०% उत्तरदाते निवडणूकीत सहभागी होते. तर १५ म्हणजेच ३७.५०% उत्तरदाते निवडणूकीत सहभागी होत नाही.

वरील विश्लेषणावरून असे दिसून येते की, जास्तीत जास्त उत्तरदाते निवडणूकीत सहभागी होते.

## सारणी क्रमांक ३.९

### स्वत: निवडणूक लढविण्यामध्ये सहभाग दर्शविणारी सारणी

| अनु क्रमांक | पर्याय | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१. | स्वत: निवडणूक लढवितो | १७ | ४२.५० % |
| ०२. | स्वत: निवडणूक लढवित नाही | २३ | ५७.५० % |
| | एकूण | ४० | १००.०० % |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, अध्यनाकरिता घेतलेल्या एकूण ४० उत्तरदात्यांचे १७ म्हणजेच ४२.५०% उत्तरदाते स्वत: निवडणूक लढवितात. तर २३ म्हणजेच ५७.५०% उत्तरदाते स्वत: निवडणूक लढवित नाही.

वरील विश्लेषणावरून असे दिसुन येते की, जास्तीत जास्त उत्तरदाते स्वत: निवडणूक लढवित नाही.

## सारणी क्रमांक ३.१०

## निवडणूकीत इतर समाजाकडून मिळणारे सहकार्य दर्शविणारी सारणी

| अनु क्रमांक | पर्याय | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१. | काही प्रमाणात | १७ | ४२.५०% |
| ०२. | पूर्णत: | १५ | ३७.५०% |
| ०३. | सहकार्य मिळत नाही | ०८ | २०.००% |
| | एकूण | ४० | १००.००% |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, अध्ययनाकरिता घेतलेल्या एकूण ४० उत्तरदात्यांपैकी १७ म्हणजेच ४२.५०% उत्तरदात्यांना निवडणूकीत इतर समाजाकडून काही प्रमाणात सहकार्य मिळते. तर १५ म्हणजेच ३७.५०% उत्तरदात्यांना निवडणूकीत इतर समाजाकडून पूर्णत: सहकार्य मिळते. तर ०८ म्हणजेच २०.००% उत्तरदात्यांना निवडणूकीत इतर समाजाकडून सहकार्य मिळत नाही.

वरील विश्लेषणावरून असे दिसुन येते की, जास्तीत जास्त उत्तरदात्यांना निवडणूकीत इतर समाजाकडून काही प्रमाणात सहकार्य मिळते.

## सारणी क्रमांक ३.११

## इतर सदस्यांचे शिक्षण दर्शविणारी सारणी

| अ. क्र. | पर्याय | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१. | प्राथमिक | ११ | २७.५०% |
| ०२. | माध्यमिक | ०६ | १५.००% |
| ०३. | उच्च माध्यमिक | ११ | २७.००% |
| ०४ | महाविद्यालयीन | १२ | ३०.००% |
| | एकूण | ४० | १००.००% |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, अध्ययनाकरिता घेतलेल्या एकूण ४० उत्तरदात्यांपैकी ११ म्हणजेच २७.५० % उत्तरदात्यांच्या कुटुंबातील इतर सदस्यांचे शिक्षण प्राथमिक पर्यंत झाले आहेत. तर ०६ म्हणजेच १५.०० % उत्तरदात्यांच्या कुटुंबातील इतर सदस्यांचे शिक्षण माध्यमिक पर्यंत झाले आहे. तर ११ म्हणजेच २७.५०% उत्तरदात्यांच्या कुटुंबातील इतर सदस्यांचे शिक्षण उच्च माध्यमिक पर्यंत झाले आहेत. तर १२ म्हणजेच ३०.०० % उत्तरदात्यांच्या कुटुंबातील इतर सदस्यांचे शिक्षण महाविद्यालयीन झाले आहेत.

वरील विश्लेषणावरून असे दिसुन येते की, जास्तीत जास्त उत्तरदात्यांच्या कुटुंबातील इतर सदस्यांचे शिक्षण महाविद्यालयीन झाले आहेत.

## सारणी क्रमांक ३.१२

## मुला-मुलींना कुठपर्यंत शिक्षण देणे आवडेल दर्शविणारी सारणी

| अनु क्रमांक | पर्याय | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१. | प्राथमिक | ०२ | ०५.००% |
| ०२. | माध्यमिक | ०६ | १५.००% |
| ०३. | उच्च माध्यमिक | ०६ | १५.००% |
| ०४. | महाविद्यालयीन | २६ | ६५.००% |
| | एकूण | ४० | १००.००% |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, अध्ययनाकरिता घेतलेल्या एकुण ४० उत्तरदात्यांपैकी ०२ म्हणजेच ०५.०० उत्तरदात्यांच्या मते मुला-मुलींना प्राथमिक पर्यंत शिक्षण देणे आवडेल. तर ०६ म्हणजेच १५.०० उत्तरदात्यांच्या मते मुला-मुलींना माध्यमिक पर्यंत शिक्षण देणे आवडेल. तर ०६ म्हणजेच १५.०० उत्तरदात्यांच्या मते मुला-मुलींना उच्च माध्यमिक पर्यंत शिक्षण देणे आवडेल. तर २६ म्हणजेच ६५.०० उत्तरदात्यांच्या मते मुला-मुलींना महाविद्यालयीन शिक्षण देणे आवडेल.

वरील विश्लेषणावरून असे दिसून येते की, जास्तीत जास्त उत्तरदात्यांच्या मते मुला-मुलींना महाविद्यालयीन शिक्षण देणे आवडेल.

# आर्थिक व सामाजिक माहिती

## सारणी क्रमांक ३.१३

## मुख्य व्यवसाय दर्शविणारी सारणी

| अनु क्रमांक | पर्याय | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१. | शेती | १२ | ३०.००% |
| ०२. | नोकरी | ११ | २७.५०% |
| ०३. | मजुरी | ११ | २७.५०% |
| ०४. | धंदा | ०३ | ०७.५०% |
| ०५. | इतर | ०३ | ०७.५०% |
| | एकुण | ४० | १००.००% |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, अध्ययनाकरिता घेतलेल्या एकुण ४० उत्तरदात्यांपैकी १२ म्हणजेच ३०.०० % उत्तरदात्यांच्या मुख्य व्यवसाय शेती आहे. तर ११ म्हणजेच २७.५०% उत्तरदात्यांचा मुख्य व्यवसाय नोकरी आहे. तर ११ म्हणजेच २७.५०% उत्तरदात्यांचा मुख्य व्यवसाय मजुरी आहे. तर ०३ म्हणजेच ०७.५० % उत्तरदात्यांचा मुख्य व्यवसाय इतर आहे.

वरील विश्लेषणावरून असे दिसून येते की, जास्तीत जास्त उत्तरदात्यांचा मुख्य व्यवसाय शेती आहे.

## सारणी क्रमांक ३.१४

## शेती आहे काय हे दर्शविणारी सारणी

| अनु क्रमांक | पर्याय | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१. | होय | २१ | ५२.५०% |
| ०२. | नाही | १९ | ४७.५०% |
| | एकुण | ४० | १००.००% |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, अध्ययना करिता घेतलेल्या एकुण ४० उत्तरदात्यांपैकी २१ म्हणजेच ५२.५० % उत्तरदात्यांकडे शेती आहे. तर १९ म्हणजेच ४७.५०% उत्तरदात्यांकडे शेती नाही.

वरील विश्लेषणावरून असे दिसून येते की, जास्तीत जास्त उत्तरदात्यांकडे शेती आहे.

## सारणी क्रमांक ३.१५

## शेती असल्यास किती एकर दर्शविणारी सारणी

| अनु क्रमांक | पर्याय | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१. | १ ते ३ एकर | १० | २५.००% |
| ०२. | ४ ते ६ एकर | ०६ | १५.००% |
| ०३. | ६ एकर च्या वर | ०५ | १२.५०% |
| ०४. | लागु पडत नाही | १९ | ४७.५०% |
| | एकुण | ४० | १००.००% |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, अध्ययनाकरिता घेतलेल्या एकुण ४० उत्तरदात्यांपैकी १० म्हणजेच २५.०० उत्तरदात्यांकडे १ ते ३ एकर शेती आहे. तर ०६ म्हणजेच १५.०० उत्तरदात्यांकडे ४ ते ६ एकर शेती आहे. तर ०५ म्हणजेच १२.५० उत्तरदात्यांकडे ६ एकर च्या वर शेती आहे. तर १९ म्हणजेच ४७.५० उत्तरदात्यांकडे शेती नसल्यामुळे त्यांना हा प्रश्न लागु पडत नाही.

वरील विश्लेषणावरून असे दिसून येते की, जास्तीत जास्त उत्तरदात्यांकडे शेती नसल्यामुळे त्यांना हा प्रश्न लागु पडत नाही.

## सारणी क्रमांक ३.१६

## शेतीला पुरक जोडधंदा दर्शविणारी सारणी

| अनु क्रमांक | पर्याय | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१. | पुरक जोडधंदा आहे | २१ | ५२.५०% |
| ०२. | पुरक जोडधंदा नाही | १९ | ४७.५०% |
| | एकुण | ४० | १००.००% |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, अध्ययनाकरिता घेतलेल्या एकूण ४० उत्तरदात्यांपैकी २१ म्हणजेच ५२.५०% उत्तरदात्यांकडे शेतीला पुरक जोडधंदा आहेत. तर १९ म्हणजेच ४७.५०% उत्तरदात्यांकडे शेतीला पुरक जोडधंदा नाही.

वरील विश्लेषणावरून असे दिसून येते की, जास्तीत जास्त उत्तरदात्यांकडे शेतीला पुरक जोडधंदा आहेत.

## सारणी क्रमांक ३.१७

## जोडधंदा दर्शविणारी सारणी

| अनु क्रमांक | पर्याय | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१. | दुग्ध व्यवसाय | ०५ | १२.५०% |
| ०२. | पशुपालन | ०९ | २२.५०% |
| ०३. | कुक्कुटपालन | ०४ | १०.००% |
| ०४. | इतर | ०३ | ०८.५०% |
| ०५. | लागु पडत नाही | १९ | ४७.५०% |
| | एकूण | ४० | १००.००% |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, अध्ययनाकरिता घेतलेल्या एकूण ४० उत्तरदात्यांपैकी ०५ म्हणजेच १२.५० उत्तरदाते दुग्ध व्यवसाय हा जोडधंदा करतात. तर ०९ म्हणजेच २२.५०% उत्तरदाते पशुपालन हा जोडधंदा करतात. तर ०४ म्हणजेच १०.००% उत्तरदाते कुक्कुटपालन हा जोडधंदा करतात. तर ०३ म्हणजेच ०८.५०% उत्तरदाते इतर जोडधंदा करतात. तर १९ म्हणजेच ४७.५० % उत्तरदाते जोडधंदा करत नसल्यामुळे लागु पडत नाही.

वरील विश्लेषणावरून असे दिसून येते की, जास्तीत जास्त उत्तरदाते जोडधंदा करत नसल्यामुळे लागु पडत नाही.

## सारणी क्रमांक ३.१८

## कर्जाविषयी  माहिती दर्शविणारी सारणी

| अनु क्रमांक | पर्याय | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१. | कर्ज घेतले | २६ | ६५.००% |
| ०२. | कर्ज घेतले नाही | १४ | ३५.००% |
| | एकूण | ४० | १००.००% |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, अध्ययनाकरिता घेतलेल्या एकूण ४० उत्तरदात्यांपैकी २६ म्हणजेच ६५.००% उत्तरदात्यांनी कर्ज घेतले आहे. तर १४ म्हणजेच ३५.००% उत्तरदात्यांनी कर्ज घेतले नाही.

वरील विश्लेषणावरून असे दिसून येते की, जास्तीत जास्त उत्तरदात्यांनी कर्ज घेतले आहे.

## सारणी क्रमांक ३.१९

## कर्जाचे स्वरूप दर्शविणारी सारणी

| अनु क्रमांक | पर्याय | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१. | मित्र | ०४ | १०.००% |
| ०२. | सावकार | ०२ | ०५.००% |
| ०३. | बँक | १८ | ४५.००% |
| ०४. | इतर | ०२ | ०५.००% |
| ०५. | लागु पडत नाही | १४ | ३५.००% |
| | एकूण | ४० | १००.००% |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, अध्ययनाकरिता घेतलेल्या एकुण ४० उत्तरदात्यांपैकी ०४ म्हणजेच १०.००% उत्तरदात्यांनी मित्राकडून कर्ज घेतले. तर ०२ म्हणजेच ०५.०० % उत्तरदात्यांनी सावकाराकडून कर्ज घेतले. तर १८ म्हणजेच ४५.०० % उत्तरदात्यांनी बँकेकडून कर्ज घेतले. तर ०२ म्हणजेच ०५.०० % उत्तरदात्यांनी इतर माध्यमातुन कर्ज घेतले. तर १४ म्हणजेच ३५.००% उत्तरदात्यांनी कर्ज घेतले नसल्यामुळे लागु पडत नाही.

वरील विश्लेषणावरून असे दिसून येते की, जास्तीत जास्त उत्तरदात्यांनी बँकेकडून कर्ज घेतले.

## सारणी क्रमांक ३.२०

### कर्ज कोणत्या कामासाठी घेतले याबाबत माहिती दर्शविणारी सारणी

| अनु क्रमांक | पर्याय | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१. | लग्न | ०३ | ०७.५०% |
| ०२. | व्यवसाय | ०२ | ०५.००% |
| ०३. | शेती | २१ | ५२.५०% |
| ०४. | लागु पडत नाही | १४ | ३५.००% |
| | एकूण | ४० | १००.००% |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, अध्ययनाकरिता घेतलेल्या एकूण ४० उत्तरदात्यांपैकी ०३ म्हणजेच ०७.५०% उत्तरदात्यांनी कर्ज लग्नासाठी घेतले होते. तर ०२ म्हणजेच ०५.००% उत्तरदात्यांनी कर्ज व्यवसायासाठी घेतले होते. तर २१ म्हणजेच ३५.००% उत्तरदात्यांनी कर्ज शेतीसाठी घेतले होते. तर १४ म्हणजेच ३५.००% उत्तरदात्यांनी कर्ज घेतले नसल्यामुळे लागु पडत नाही.

वरील विश्लेषणावरून असे दिसून येते की, जास्तीत जास्त उत्तरदात्यांनी कर्ज शेतीसाठी घेतले होते.

## सारणी क्रमांक ३.२१

## कर्जाची परतफेड दर्शविणारी सारणी

| अनु क्रमांक | पर्याय | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१. | काही प्रमाणात | १५ | ३७.५०% |
| ०२. | पूर्णत: | ०५ | १२.५०% |
| ०३. | परतफेड झाली नाही | ०६ | १५.००% |
| ०४. | लागु पडत नाही | १४ | ३५.००% |
| | एकूण | ४० | १००.००% |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, अध्ययनाकरिता घेतलेल्या एकुण ४० उत्तरदात्यांपैकी १५ म्हणजेच ३७.५०% उत्तरदात्यांनी कर्जाची परतफेड काही प्रमाणांत केली आहे. तर ०५ म्हणजेच ३७.५०% उत्तरदात्यांनी कर्जाची परतफेड काही प्रमाणात केली आहे. तर ०५ म्हणजेच १२.५०% उत्तरदात्यांनी कर्जाची परतफेड केली नाही. तर १४ म्हणजेच ३५.००% उत्तरदात्यांनी कर्ज घेतले नसल्यामुळे लागु पडत नाही.

वरील विश्लेषणावरून असे दिसून येते की, जास्तीत जास्त उत्तरदात्यांनी कर्जाची परतफेड काही प्रमाणात केली आहे.

## सारणी क्रमांक ३.२२

## बचत करता काय हे दर्शविणारी सारणी

| अनु क्रमांक | पर्याय | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१. | बचत करतो | २१ | ५२.५०% |
| ०२. | काही प्रमाणात | १५ | ३५.००% |
| ०३. | बचत करत नाही | ०५ | १२.५०% |
| | एकूण | ४० | १००.००% |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, अध्ययनाकरिता घेतलेल्या एकुण ४० उत्तरदात्यांपैकी २१ म्हणजेच ५२.५०% उत्तरदाते बचत करतात. तर १५ म्हणजेच ३५.००% उत्तरदाते काही प्रमाणात बचत करतात. तर ०५ म्हणजेच १२.५०% उत्तरदाते बचत करतात.

वरील विश्लेषणावरून असे दिसून येते की, जास्तीत जास्त उत्तरदाते बचत करतात.

## सारणी क्रमांक ३.२३

### सामाजिक जीवन कशाप्रकारे व्यतीत हे दर्शविणारी सारणी

| अ.क्र. | पर्याय | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१. | साधारण | २२ | ५५.००% |
| ०२. | कष्टाचे | ०५ | १२.५०% |
| ०३. | सुखमय | १३ | ३२.५०% |
| | एकूण | ४० | १००.००% |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, अध्ययनाकरिता घेतलेल्या एकूण ४० उत्तरदात्यांपैकी २२ म्हणजेच ५५.०० उत्तरदात्यांचे सामाजिक जीवन साधारण आहेत. तर ०५ म्हणजेच १२.५० उत्तरदात्यांचे सामाजिक जीवन कष्टाचे आहेत. तर १३ म्हणजेच ३२.५० उत्तरदात्यांचे सामाजिक जीवन सुखमय आहेत.

वरील विश्लेषणावरून असे दिसून येते की, जास्तीत जास्त उत्तरदात्यांचे सामाजिक जीवन साधारण आहेत.

## सारणी क्रमांक ३.२३

### सामाजिक जीवन कशाप्रकारे व्यतीत हे दर्शविणारी सारणी

| अ.क्र. | पर्याय | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१. | साधारण | २२ | ५५.००% |
| ०२. | कष्टाचे | ०५ | १२.५०% |
| ०३. | सुखमय | १३ | ३२.५०% |
| | एकूण | ४० | १००.००% |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, अध्ययनाकरिता घेतलेल्या एकूण ४० उत्तरदात्यांपैकी २२ म्हणजेच ५५.०० उत्तरदात्यांचे सामाजिक जीवन साधारण आहेत. तर ०५ म्हणजेच १२.५० उत्तरदात्यांचे सामाजिक जीवन कष्टाचे आहेत. तर १३ म्हणजेच ३२.५० उत्तरदात्यांचे सामाजिक जीवन सुखमय आहेत.

वरील विश्लेषणावरून असे दिसून येते की, जास्तीत जास्त उत्तरदात्यांचे सामाजिक जीवन साधारण आहेत.

## सारणी क्रमांक ३.२४

## सामाजिक कार्यात सहभाग दर्शविणारी सारणी

| अनु क्रमांक | पर्याय | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१. | सहभागी होतो | २४ | ६०.००% |
| ०२. | सहभागी होत नाही | १६ | ४०.००% |
| | एकूण | ४० | १००.००% |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, अध्ययनाकरिता घेतलेल्या एकुण ४० उत्तरदात्यांपैकी २४ म्हणजेच ६०.००% उत्तरदाते सामाजिक कार्यात सहभागी होते. तर १६ म्हणजेच ४०.००% उत्तरदाते सामाजिक कार्यात सहभागी होत नाही.

वरील विश्लेषणावरून असे दिसुन येते की, जास्तीत जास्त उत्तरदाते सामाजिक कार्यात सहभागी होते.

## सारणी क्रमांक ३.२५

## शौचालय आहे काय हे दर्शविणारी सारणी

| अनु क्रमांक | पर्याय | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१. | शौचालय आहे | ३१ | ७७.५०% |
| ०२. | शौचालय नाही | ०९ | २२.५०% |
| | एकूण | ४० | १००.००% |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, अध्ययनाकरिता घेतलेल्या एकुण ४० उत्तरदात्यांपैकी ३१ म्हणजेच ७७.५०% उत्तरदात्यांकडे शौचालय आहेत. तर ०९ म्हणजेच २२.५०% उत्तरदात्यांकडे शौचालय नाही.

वरील विश्लेषणावरून असे दिसून येते की, जास्तीत जास्त उत्तरदात्यांकडे शौचालय आहेत.

## सारणी क्रमांक ३.२६

## सांडपाण्याची व्यवस्था दर्शविणारी सारणी

| अनु क्रमांक | पर्याय | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१. | व्यवस्था केली जात नाही | ०९ | २२.५०% |
| ०२. | शोषखड्डा | ०५ | १२.५०% |
| ०३. | इतर | ०२ | ०५.००% |
| ०४ | नालीद्वारे | २४ | ६०.००% |
| | एकूण | ४० | १००.००% |

वरील सारणी वरून असे निदर्शनास येते की, अध्ययनाकरिता घेतलेल्या एकुण ४० उत्तरदात्यांपैकी ०९ म्हणजेय २२.५०% उत्तरदात्यांच्या मते सांडपाण्याची व्यवस्था केली जात नाही. तर ०५ म्हणजेच १२.५०% उत्तरदात्यांच्या मते सांडपाण्याची व्यवस्था शोषखड्याद्वारेकेली जाते. तर ०२ म्हणजेच ०५.००% उत्तरदात्यांच्या मते सांडपाण्याची व्यवस्था इतर माध्यमाद्वारे केली जाते. तर २४ म्हणजेच ६०.००% उत्तरदात्यांच्या मते सांडपाण्याची व्यवस्था नालीद्वारे केली जाते.

वरील विश्लेषणावरून असे दिसुन येते की, जास्तीत जास्त उत्तरदात्यांच्या मते सांडपाण्याची व्यवस्था नाली द्वारे केली जाते.

## सारणी क्रमांक ३.२७

### आरोग्य चांगले राण्यासाठी ग्रामपंचायतद्वारे काम केले जातात याची जाणीव आहे काय हे दर्शविणारी सारणी

| अनु क्रमांक | पर्याय | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१. | जाणीव आहे | २९ | ७२.५०% |
| ०२. | जाणीव नाही | ११ | २७.५०% |
| | एकुण | ४० | १००.००% |

वरील सारणी वरून असे निदर्शनास येते की, अध्ययनाकरिता घेतलेल्या एकुण ४० उत्तरदात्यांपैकी २९ म्हणजेच ७२.५० उत्तरदात्यांना आरोग्य चांगले राहण्यासाठी ग्रामपंयायत द्वारे काम केले जातात याची जाणीव आहे. तर ११ म्हणजेच २७.५० उत्तरदात्यांना आरोग्य चांगले राहण्यासाठी ग्रामपंचायतद्वारे काम केले जाजात याची जाणीच नाही.

वरील विश्लेषणावरून असे दिसुन येते की, जास्तीत जास्त उत्तरदात्यांना आरोग्य चांगले राहण्यासाठी ग्रामपंचायतद्वारे काम केले जातात याची जाणीव आहे.

## सारणीक्रमांक ३.२८

## इंदिरा आवास योजनेचा लाभ मिळाला काय हे दर्शविणारी सारणी

| अनुक्रमांक | पर्याय | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१. | होय | १७ | ४२.५०% |
| ०२. | नाही | २३ | ५७.५०% |
| | एकुण | ४० | १००.००% |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, अध्ययनाकरिता घेतलेल्या एकुण४० उत्तरदात्यांपैकी १७ म्हणजेच ४२.५०% उत्तरदात्यांना इंदिरा आवास योजनेचा लाभ मिळाला . तर २३ म्हणजेच ५७.५०% उत्तरदात्यांना इंदिरा आवास योजनेचा लाभ मिळाला नाही.

वरील विश्लेषणावरूण असे दिसुन येते की, जास्तीत जास्त उत्तरदात्यांना इंदिरा आवास योजनेचा लाभ मिळाला.

**सारणी क्रमांक ३.२९**

**सामाजिक अंधश्रद्धा , रूढी, परंपरावर विश्वास दर्शविणारी सारणी**

| अ. क्र. | पर्याय | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१. | विश्वास आहे | १३ | ३२.५०% |
| ०२. | अंशत: विश्वास आहे | १४ | ३५.००% |
| ०३. | विश्वास नाही | १३ | ३२.५०% |
| | एकुण | ४० | १००.००% |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, अध्ययनाकरिता घेतलेल्या एकुण ४० उत्तरदात्यांपैकी १३ म्हणजेच ३२.५०% उत्तरदात्यांचा सामाजिक अंधश्रद्धा,रूढी, परंपरावर विश्वास आहेत. तर १४ म्हणेच ३५.००% उत्तरदात्यांचा सामाजिक अंधश्रद्धा,रूढी, परंपरावर अंशत: विश्वास आहेत तर १३ म्हणजेच ३२.५०% उत्तरदात्यांचा सामाजिक अंधश्रद्धा, रूढी, परंपरावर विश्वास नाही.

वरील विश्लेषणावरून असे दिसुन येते की, जास्तीत जास्त उत्तरदात्यांचा सामाजिक अंधश्रद्धा,रूढी, परंपरावर अंशत: विश्वास आहे.

## सारणी क्रमांक ३.३०

## अंधश्रध्देस बळी पडला काय हे दर्शविणारी सारणी

| अ.क्र. | पर्याय | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१. | होय | २३ | ५७.५०% |
| ०२. | नाही | १७ | ४२.५०% |
| | एकुण | ४० | १००.००% |

वरील सारणी वरून असे निदर्शनास येते की, अध्ययनाकरिता घेतलेल्या एकुण ४० उत्तरदात्यांपैकी २३ म्हणजेच उत्तरदाते अंधश्रध्देस बळी पडले होते. तर १७ म्हणजेच ४२.५०% उत्तरदाते अंधश्रद्धेस बळी पडले नाही.

वरील विश्लेषणावरून असे दिसुन येते की, जास्तीत जास्त उत्तरदाते अंधश्रध्देस बळी पडले होते.

## सारणी क्रमांक ३.३१

### विकासात जुन्या प्रथा, परंपरांचा अडथळा दर्शविणारी सारणी

| अनु क्रमांक | पर्याय | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१. | होय | ३० | ०७.५०% |
| ०२. | काही प्रमाणात | १८ | ४५.००% |
| ०३. | नाही | १९ | ४७.५०% |
| | एकुण | ४० | १००.००% |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, अध्ययनाकरिता घेतलेल्या एकुण ४० उत्तरदात्यांपैकी ०३ म्हणजेच ०७.५०% उत्तरदात्यांच्या मते विकासात जुन्या प्रथा, परंपराचा अडथळा निर्माण करीत असतात. तर १८ म्हणजेच ४५.००% उत्तरदात्यांच्या मते विकासात जुन्या प्रथा, परंपराचा अडथळा काही प्रमाणात निर्माण करीत असतात. तर १९ म्हणजेच ४७.५०% उत्तरदात्यांच्या मते विकासात जुन्या प्रथा, पंरपराचा अडथळा निर्माण करीत नाही.

वरील विश्लेषणावरून असे दिसुन येते की, जास्तीत जास्त उत्तरदात्यांच्या मते विकासात जुन्या प्रथा, पंरपराचा अडथळा निर्माण करीत नाही.

प्रकरण चौथे

# ठळक निष्कर्ष

१. शेतीला पुरक असा लहान- मोठा व्यवसायही करता येत नाही, कारण त्यांचे उत्पन्न कमी असते. त्या मुळे ते उत्पन्न मुलभुत गरजा भागविण्यात खर्च होते.

२. अनुसुचित जातीतील लोकांचे उत्पन्न कमी असल्यामुळे शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. पण आता ते वाढत आहे. शासनाच्या सर्व सोयी सवलतींचा लाभ हळूहळू त्यांना मिळत आहे.

३. अनु. जातीतील लोकांकडे पैसा कमी असल्यामुळे ते जास्त खर्च इतर गोष्टीवर न करता शिक्षणावर करतात.

४. अनुसुचित जातीतील लोकांत बऱ्याचशा अंधश्रद्धा आहेत. त्यामुळे या रूढी, प्रथा, परंपरा,अंधश्रद्धा त्यांच्या विकासात अडचण निर्माण करतात.

५. आजही गावामधे सामाजिक व्यवहारात थोडाफार भेदभाव केला जातो त्यामुळे त्यांच्या विकासात अडथळे निर्माण होतात.

# गृहितकृत्याची पडताळणी

१. अनु.जातीमधील लोकांचे उत्पन्न कमी असल्यामुळे त्यांचे राहणीमान कनिष्ठ दर्जाचे आहे.

वरील गृहितकृत्ये सारणी क्रमांक ३.७ वरून सत्य ठरले आहे.

२. अनु. जातीमधील लोकांत शिक्षणाचे प्रमाण कमी आहे.

वरील गृहितकृत्ये सारणी क्रमांक ३.३ वरून सत्य ठरले आहे.

३. तास या गावातील अनु. जातीमधील लोकांत बऱ्याचशा अंधश्रद्धा आहेत.

वरील गृहितकृत्ये सारणी क्रमांक ३.१७ व ३.१८ वरून सत्य ठरले आहे.

४. तास या गावामध्ये सामाजीक व दैनंदिन व्यवहारातही भेदभाव केला जाते.

वरील गृहितकृत्ये सारणी क्रमांक ३.११ व ३.१२ वरून सत्य ठरले आहे.

## सुचना व शिफारशी

१. अनु. जातीच्या लोकांचा मुख्य व्यवसाय शेती असल्यामुळे त्यांचे राहणीमान सुधारणाकरीता आधुनिक पद्धतीने शेतीचे ज्ञान द्यावे. त्यामुळे उत्पादन क्षमता वाढुन उत्पन्नात भर होईल.

२. अनु. जातीच्या मुलांच्या विकासासाठी विविध मोफत व्यावसायीक प्रशिक्षण देवुन रोजगार उपलब्ध करून द्यावे.

३. निवडणुकीत स्वत: निवडणुक लढण्याकरीता सहकार्य करावे व पाठबळ द्यावे.

४. त्यांना लघुव्यवसायाचे ज्ञान देवुन अल्प व्याजदराने कर्ज देवुन लघु उद्योग सुरू करून द्यावा. त्या करिता प्रशिक्षण देणे व प्रत्येक गावापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे.

५. इंदिरा आवास योजनेचा खरा लाभ मिळवून द्यावा. त्याची काटेकोर पाहणी व अलबजावणी करावी.

६. अनु. जातीतील लोकांना बचत गटाच्या माध्यामातून बचतीचे महत्व पटवुन द्यावे.त्याकरिता प्रत्यक्ष अधिकाऱ्यांनी भेटी देवून त्यांना स्वावलंबी बनवावे.

## संदर्भ ग्रंथसूची

१) डॉ. आगलावे प्रदिप, "संशोधन शास्त्र व तंत्रे", प्रमोद विद्या प्रकाशन, नागपूर.

२) डॉ. अलोनी विवेक, डॉ. बोधनकर सुधिर, " सामाजिक संशोधन तत्वे व पद्धती", श्री साईनाथ प्रकाशन, भगवाघर कॉम्पेस धरमपेठ नागपूर, चतुर्थ आवृत्ती – जानेवारी २००६

३) प्रा. भांडारकर पु. ल. "सामाजिक संशोधनाच्या पद्धती" , विद्या प्रकाशन, नागपूर

४) प्रा. घाटोळे रा. ना., " सामाजिक शास्त्र संशोधन तत्वे व पद्धती" , श्री. मंगेश प्रकाशन रामदास पेठ, नागपूर, आवृत्ती – जुलै १९९६

५) प्रा. फडके य. दी., "डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि काळाराम सत्याग्रह" सुगावा प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती – १९९६

६) प्रा. डॉ. निकुंभे, "समाज प्रबोनकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर" सुगावा प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती २००५

७) प्रा. खैरमोडे चां. भ., "डॉ. भिमराव आंबेडकर अस्पृश्यांचा उद्धारक" सुगावा प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती १९७८

८) डॉ. मेश्राम सुरेश, "प्रात्यक्षिक संशोधन पद्धती" कृष्णचंद प्रकाशन नागपूर, प्रथम आवृत्ती – सप्टेंबर २०००

९) डॉ. निलम ताटके, "संशोधन करतानां" डायमंड पब्लीकेशन पुणे, प्रथम आवृत्ती प्रकाशन २००८

१०) प्रा. प्रशांत कुमार, " सांख्यिकी" गणेश प्रकाशन महाल नागपूर, चतुर्थ आवृत्ती – १९९३-९४

११) डॉ. प्रभुणे, " वर्णनात्मक सांख्यिकी" , विद्या प्रकाशन, नागपूर २००६

१२) सिंह एक. "सांख्यिकी के मुलतत्व" , एस. चंद अॅण्ड कंपनी लि. मी. रामनगर, नई दिल्ली, आठवी आवृत्ती – १९९५

१३) शर्मा गोकुलचंद, "सांख्यिकीय विविधा" शिवलाल अग्रवाल अॅण्ड कंपनी इंदोर, द्वितीय आवृत्ती – १९९२

भिवापूर महाविद्यालय भिवापूर, ता. भिवापूर जि. नागपूर

शैक्षणिक सत्र : २०१८-१९

# मुलाखत अनुसूची

## "भिवापूर तालुक्यातील तास या गावातील अनुसूचित जातीच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे अध्ययन."


मार्गदर्शक

प्रा. डा. विजय एस. दिघोरे

एम.ए.एम.फिल. पी.एच.डी

भिवापूर महाविद्यालय भिवापूर

संशोधनकर्ते

एम.ए. भाग 1


---

उत्तरदात्याचे नाव व पत्ता : ---------------------------------------------------------------

-

---------------------------------------------------------------

-

विभाग 'अ'

### उत्तरदात्याची वैयक्तिक व कौटुंबिक माहिती

१) उत्तरदात्याचे लिंग

अ) स्त्री ब) पुरूष

२) उत्तरदात्याचा वयोगट

अ) १८ ते २८ वर्ष ब) २९ ते ३८

क) ३९ ते ४८ ड) ४९ते ५८

इ) ५९ च्या वर

३) उत्तरदात्यांचे शिक्षण

अ) अशिक्षीत	ब) प्राथमिक

क) माध्यमिक	ड) उच्च माध्यमिक

इ) पदवीधर	ई) पदवृत्तर

४) उत्तरदात्याचा वैवाहिक दर्जा

अ) अविवाहीत	ब) विवाहित

क) विधवा	ड) विधूर

५) उत्तरदात्याच्या कुटुंबाचा प्रकार

अ) संयुक्त कुटुंब	ब) विभक्त कुटुंब

६) उत्तरदात्याच्या कुटुंबातील सदस्यांची संख्या

अ) १ ते २	ब) ३ ते ५

क) ६ ते ९

७) उत्तरदात्याचे घराचा प्रकार

अ) कुडाचे	ब) मातीचे

क) सिमेंट

८) आपले एकूण मासिक उत्पन किती ?

अ) २००० ते ३००० रू.	ब) ३००१ ते ४००० रू.

क) ४००१ ते ५००० रू.	ड) ५००० रू. पेक्षा जास्त

## विभाग 'ब'

## उत्तरदात्यांची शैक्षणीक माहिती

९) कुटुंबातील इतर सदस्यांचे शिक्षण देणे आवडेल ?

अ) प्राथमिक	ब) माध्यमिक

क) उच्च माध्यमिक	ड) महाविद्यालयीन

१०) मुलामुलींना कुठपर्यंत शिक्षण देणे आवडेल ?

अ) प्राथमिक	ब) माध्यमिक

क) उच्च माध्यमिक	ड) महाविद्यालयीन

११) वाढत्या महागाईमुळे शैक्षणिक खर्च आपणास जास्त वाटते काय ?

अ) काही प्रमाणात	ब) पुर्णत:

क) नाही

१२) अशिक्षित असल्यामुळे आपली फसवणूक झाली आहे काय ?

अ) फसवणूक झाली	ब) फसवणूक झाली नाही

क) लागु पडत नाही

विभाग 'क'

## आर्थिक व सामाजिक माहिती

१३) आपला मुख्य व्यवसाय कोणता ?

अ) शेती ब) मजूर

क) धंदा ड) नोकरी

इ) इतर

१४) शेती आहे काय ?

अ) शेती आहे ब) शेती नाही

१५) शेती असल्यास किती एकर आहे ?

अ) १ ते ३ एकर ब) ४ ते ६ एकर

क) ७ एकरच्या वर ड) लागू पडत नाही

१६) शेतीला पुरक जोडधंदा आहे काय ?

अ) पुरक जोडधंदा आहे ब) पुरक जोडधंदा नाही

क) लागू पडत नाही

१७) जोडधंदा करित असल्यास कोणता ?

अ) दुग्ध व्यवसाय ब) पशुपालन

क) कुकूटपालन ड) लागू पडत नाही

१८) आपण कर्ज घेतले आहे का ?

अ) कर्ज घेतले आहे ब) कर्ज घेतले नाही

१९) कर्ज घेतले असता त्याचे स्वरूप कसे ?

अ) सावकार ब) बँक

क) इतर ड) लागू पडत नाही

२०) कर्ज कोणत्या कामासाठी घेतले ?

अ) लग्न ब) व्यवसाय

क) शेती ड) घर बांधकामासाठी

२१) कर्ज परतफेड झाले काय ?

अ) काही प्रमाणात ब) पुर्णतः

क) परतफेड झाले नाही ड) लागू पडत नाही

२२) बचत करता काय ?

अ) बचत करतो ब) काही प्रमाणात बचत करतो

क) बचत करत नाही

२३) बचत कुठेकरता ?
अ) बॅंक
ब) विमा
क) घरी
ड) पोस्ट ऑफीस

२४) आपल्या उत्पन्नतून आपल्या मुलभूत गरजा पुर्ण होतात काय ?
अ) गरजा पुर्ण होतात
ब) अंशत: पुर्ण होतात
क) पुर्ण होत नाही

२५) आर्थिक संकटकालीन परिस्थितीत गावातील लोक आपल्याला सहकार्य करतात काय?
अ) काही प्रमाणात
ब) पुर्णत:
क) सहकार्य करत नाही

२६) आपण आपले सामाजिक जीवन कसे व्यतीत करता ?
अ) साधारण
ब) कष्टाचे
क) सुखमय

२७) आपण सामाजिक कार्यात सहभागी होता काय ?
अ) सहभागी होतो
ब) सहभागी होत नाही
क) काही प्रमाणात

२८) आपण ज्या परिसरात राहतो तो परिसर आपणास योग्य वाटतो काय ?
अ) योग्य वाटतो
ब) योग्य वाटत नाही

२९) आपल्याकडे शौचालय आहे काय ?
अ) शौचालय आहे
ब) शौचालय नाही

३०) आपण आपला परिसर स्वच्छ ठेवता काय ?
अ) परिसर स्वच्छ ठेवतो
ब) परिसर स्वच्छ ठेवत नाही

३१) सांडपाण्याची व्यवस्था कशी केली जाते ?
अ) शोषखड्डा
ब) नालीद्वारे
क) व्यवस्था केली जात ना
ड) इतर

३२) ग्रामपंचायतद्वारे आपले आरोग्य चांगले राहावे यासाठी उपाय केले जातात याची जाणीव आहे काय ?
अ) जाणीव आहे
ब) जाणीव नाही

३३) इंदीरा आवास योजनेचा लाभ मिळाला आहे काय ?
अ) होय
ब) नाही

३४) सामाजिक अंधश्रद्धा रूढी, प्रथा, परंपरा यावर आपला विश्वास आहे काय ?
अ) विश्वास आहे
ब) अंशत: विश्वास आहे
क) विश्वास नाही

३५) आपली वरिल घटकाबाबतीत फसवणूक झाली काय ?
अ) होय
ब) नाही

३६) आजही आपल्या विकासात जुन्या, प्रथा, परंपरा अडथळा निर्माण करतात काय ?

अ) होय ब) काही प्रमाणात

क) नाही

३७) राजकारणाशी आपला संबंध आहे काय ?

अ) तात्पुरता ब) संबंध आहे

क) संबंध नाही

३८) आपण निवडणूक सहभागी होता काय ?

अ) निवडणूकीत सहभागी होतो ब) सहभागी होत नाही

३९) स्वत: निवडणूक लढविता काय ?

अ) निवडणूक लढवितो ब) निवडणूक लढवित नाही

४०) निवडणूकीत इतर समाजाकडून सहकार्य मिळते काय ?

अ) काही प्रमाणात ब) पुर्णत:

क) सहकार्य मिळत नाही




तास या गावातील गटग्रामपंचायत प्रशिक्षण विद्यार्थी योजनाची लाभार्थी कु. मयुरी धनपाल चाहांदे यांची मुलाखत घेतांना एम. ए. भाग १ चे विद्यार्थी



तास या गावातील रमाबाई योजनेचे लाभार्थी श्री. दिनेश टेंभरे यांची मुलीखत घेतांना एम. ए. भाग १ चे विद्यार्थी




तास या गावातील रमाबाई योजनेचे लाभार्थी श्री. गजानन शंभरकर यांची मुलीखत घेतांना एम. ए. भाग १ चे विद्यार्थी






तास या गावातील सरपंच श्री. युवराज तुलाराम शंभरकर यांची मुलांखत घेतांना व गावातील विविध विषयांवर चर्चा करतांना एम. ए. भाग १ चे विद्यार्थी